
# सुधारित रोजगार हमी योजना



## संधी आणि आव्हाने

प्रयास

आरोग्य, ऊर्जा, शिक्षण आणि पालकत्व या विषयांतील विशेष प्रयत्न

संसाधने व उपजीविका गट, पुणे

**संसाधने व उपजीविका गट :**

‘मंगेशपुष्प’, सर्व्हे नं. १३३, स्वामी विवेकानंद
सोसायटी, बायफच्याजवळ, वारजे,
पुणे – ४११०५२,
फोन : (०२०) २५२३२८३६,
मोबाईल: ९४२२३१७५३०

बी २१, बी. के. ॲव्हेन्यू, सर्व्हे नं. ८७/१० ए,
आझादनगर, न्यू डी. पी. रोड, कोथरुड,
पुणे ४११०३८.
फोन : (०२०) ६५६१५५९४, ६५७०४४५३
फॅक्स – २५४२०३३७
E-mail: reli@prayaspune.org
Web-site: www.prayaspune.org

**नोंदणीकृत कार्यालय :**

अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर,
कर्वे रोड, पुणे–४११००४.
फोन : (०२०) २५४४१२३०,
२५४२०३३७

ऐच्छिक देणगी मूल्य रु. ५/–
खासगी वितरणासाठी,
जुलै २००६

# महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना


- प्रस्तावना २
- योजनेची ओळखः प्रमुख वैशिष्ट्ये ५
- कारभार प्रक्रिया १६
- नव्या संधी आणि आव्हाने २५


## परिशिष्टे


१. २३ डिसेंबर २००५ चा शासननिर्णय २९

२. २८ डिसेंबर २००५ चा शासननिर्णय ३४

३. कुटुंब ओळखपत्राचा नमुना (जॉब कार्ड) ३५

४. रोजगार पत्रकाचा नमुना ३६

# प्रस्तावना

गेल्या वर्षापासून रोजगार हमी योजना एका ऐतिहासिक वळणावर उभी आहे, असे आपण अनुभवतो आहोत. एकीकडे केंद्र सरकारने महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचा आदर्श ठेवून देशातील २०० जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केली आहे. तर दुसरीकडे रोजगार हमी योजनेच्या धोरणात महत्त्वाचे बदल करण्याची प्रक्रिया फारसा बोलबाला न करता, पण वेगाने चालू आहे. रोजगार हमी योजनेत कालानुरुप बदल करण्यासाठी शासनाने नेमलेल्या पुनर्विलोकन समितीने योजनेत मूलभूत बदल सुचवले आहेत. या समितीने सुचवलेल्या बदलांना अंतिम स्वरुप देण्याची प्रक्रिया अनिर्णित असतानाच समितीने केलेली जट्रोफा लागवडीची शिफारस शासनाने मान्यही केली आहे. या अनिश्चित, टांगत्या अवस्थेतच महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजना (रोहयो) आणि केंद्राची राष्ट्रीय ग्रामीण रोहयो यांच्या मिलाफातून 'महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना' (म.ग्रा. रोहयो) सुरु केली आहे. राज्यातील १२ जिल्ह्यांमधे योजनेची अंमलबजावणी सुरुदेखील झाली आहे, शिवाय ही योजना लवकरच संपूर्ण राज्याला लागू होणार असल्याचे शासनाने जाहीर केले आहे. असे असूनही या घडामोडीबाबत मजूर, स्वयंसेवी संस्था-संघटना एवढेच नव्हे तर शासकीय अधिकाऱ्यांमध्येही गोंधळाचे वातावरण आहे. दोन शासननिर्णय आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी शासनाने तयार केलेला दस्तावेज वगळता, शासनाने यावर स्पष्टता आणण्यासाठी काहीही साहित्य तयार केलेले आढळत नाही. अभ्यासक-कार्यकर्त्यांनी लिहिलेल्या वर्तमानपत्रीय लेखांव्यतिरिक्त या घडामोडीवर निदान आजमितीस तरी काहीही अभ्यास वा संदर्भसाहित्य तयार झालेले आम्हाला आढळले नाही. सुधारित योजना जिथे राबवली जात आहे त्या जिल्ह्यांमधून गैरकारभार, भ्रष्टाचार यासारख्या तक्रारी मात्र सातत्याने नोंदवल्या जात आहेत.

या पार्श्वभूमीवर म. ग्रा. रोहयोचे स्वरूप आणि तिची वैशिष्ट्ये समजून घेण्याची गरज वाटू लागली. राज्यशासनाने काढलेले शासन निर्णय अभ्यासताना जाणवत गेले,

की ग्रामपंचायत आणि ग्रामसभेला मिळालेल्या निर्णायक भूमिकेमुळे *'रोहयो ते म. ग्रा. रोहयो'* हा बदल रोहयोच्या इतिहासात मैलाचा दगड ठरण्याइतका महत्वाचा आहे. याच सुमारास नियोजन विभागाने विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांना म. ग्रा. रोहयोच्या कार्यवाहीबाबत पाठवलेला तपशीलवार सूचनांचा इंग्रजी दस्तावेजही वाचायला मिळाला. या दस्तावेजातून नव्या रुपातील रोहयोची, म्हणजेच म. ग्रा. रोहयोच्या ताकदीची जाणीव अधिक स्पष्टपणे झाली. त्यात सुचवलेले कागदावरील बदल प्रत्यक्षात आले, तर मूळ रोहयो खऱ्या अर्थाने वंचिताभिमुख बनवण्याच्या आपल्या प्रयत्नांना निश्चितच चालना मिळू शकेल असे जाणवले.

कोणत्याही योजनेतील बलस्थानांचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठी त्या बलस्थानांची ओळख करून घेणे ही पहिली पायरी असते. ही ओळख होते तेव्हा गावातील आदिवासी कार्यकर्तेच नव्हे, तर जागरूक मजूरही त्या माहितीचा ताकदीने उपयोग करताना दिसतात. मूळ रोहयोबाबत हे अनेक वेळा, अनेक ठिकाणी घडलेले आहे. म. ग्रा. रोहयोबाबतही हे मोठ्या प्रमाणावर आणि वेगाने घडायचे असेल, तर तिची नीट ओळख व्हायला हवी, अभ्यास आणि अनुभवाआधारे तिचे विश्लेषण व्हायला हवे, त्यातूनच भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराने ग्रासलेल्या रोहयोचे कष्टकऱ्यांसाठी पुनरुज्जीवन होण्याची प्रक्रिया सुरू होईल.

या प्रक्रियेला आमच्या मर्यादेत हातभार लावावा अशा भूमिकेतून ही पुस्तिका लिहिली आहे. रोहयो ज्यांनी अनुभवली आहे, अशा वाचकांसाठी 'सुधारित रोहयोची' म्हणजेच 'म.ग्रा. रोहयोची' ओळख या पुस्तिकेत करून दिली आहे. 'रोहयो ते म. ग्रा. रोहयो' या बदलामुळे कोणत्या नव्या संधी निर्माण झालेल्या आहेत, आणि त्या वापरताना कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे याचीही प्राथमिक मांडणी या पुस्तिकेत केली आहे.

ही पुस्तिका तयार करताना अनेकांची मदत झाली आहे. त्यापैकी काहींचा विशेष उल्लेख करणे गरजेचे आहे. *'शेतमजूर, कामगार, रोजगार हमी समन्वय समितीचे'* ज्येष्ठ कार्यकर्ते नागेश हाटकर यांनी किमान वेतनाशी निगडित नेमका संदर्भ पुरवला, तर,

पुस्तिकेच्या परिशिष्टातील शासकीय कागदपत्रांचे नमुने समन्वय समितीचे कॉ. सुरेश गवळी, त्यांचे सहकारी सुरेश पिंपळे (अहमदनगर) आणि जनार्थ आदिवासी विकास संस्थेच्या (ता. शहादा) विक्रम कान्हेरे यांनी अतिशय तत्परतेने पाठवले, त्यामुळेच पुस्तिकेत ते वेळेवर समाविष्ट करता आले. म. ग्रा. रोहयोवरील इंग्रजी शासकीय दस्तावेजही काही काळापूर्वी ज्येष्ठ कार्यकर्ते मोहन हिराबाई हिरालाल यांच्याकडून मिळाला होता. पुस्तिकेच्या मुखपृष्ठावरील श्रमजीवी संघटनेच्या कार्यक्षेत्रातील भगवान मधे (नाशिक) यांनी काढलेला फोटो उपलब्ध करुन दिल्याबद्दल साधना साप्ताहिकाचे आम्ही आभारी आहोत.

पुस्तिकेसाठी मदत केलेल्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक ऋणी आहोत. पुस्तिकेत जे काही न्यून असेल त्याची जबाबदारी मात्र पूर्णतः आमची आहे.

■ ■ ■

# योजनेची ओळख : प्रमुख वैशिष्ट्ये

रोहयोप्रमाणेच महाराष्ट्र ग्रामीण रोहयोची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण आहे, किंबहुना रोहयोच्या आजवरच्या इतिहासाला निर्णायक वळण देण्याची ताकद या योजनेमधे आहे. म्हणूनच या वैशिष्ट्यांची ओळख आपण करुन घ्यायला हवी. या नव्या घडामोडींची पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय ही ओळख करुन घेता येणार नाही.

## पार्श्वभूमी

महाराष्ट्र ग्रामीण रोहयोचा जन्मच राष्ट्रीय पातळीवरील महत्वपूर्ण घडामोडीतून झालेला आहे. केंद्रातील आघाडी सरकारच्या किमान समान कार्यक्रमातील 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी'चा खूपच गाजावाजा झाला. 'राष्ट्रीय पातळीवरील रोजगार हमी' च्या शक्याशक्यतेवर आर्थिक-सामाजिक अंगांनी भरपूर चर्चा झाली. रोजगार अधिकारासाठी आधीपासूनच झटणाऱ्या जनसंघटनांचे अविरत प्रयत्न आणि डाव्या पक्षांचा पाठिंबा यामुळे हे आश्वासन प्रत्यक्षातही आले. जून २००५ मधे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा अस्तित्वात आला. या कायद्यानुसार जम्मू-काश्मीर वगळता, देशातील सर्व राज्यांमधे आता वर्षातील १०० दिवस प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला रोजगाराची हमी मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात २०० मागास जिल्ह्यांसाठी हा कायदा लागू असला तरी क्रमाक्रमाने येत्या पाच वर्षात संपूर्ण देशासाठी तो लागू होणार आहे. राष्ट्रीय कायद्यानुसार प्रत्येक राज्याने सहा महिन्यांच्या कालावधीत राज्यपातळीवरील ग्रामीण रोजगार हमी योजना तयार करायची आहे. राष्ट्रीय कायद्यातील मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियम व प्रक्रियाही या राज्यांनी तयार करायच्या आहेत. (राष्ट्रीय कायदा, कलम ४(१), प्रकरण३)

राष्ट्रीय कायद्याचे कलम २८ महाराष्ट्राला लागू आहे. या कलमानुसार 'ज्या राज्यांमधे रोजगार हमी योजना अस्तित्वात असेल व रोजगाराची हमी केंद्रीय कायद्याने दिलेल्या हमीपेक्षा कोणत्याही दृष्टीने कमी नसेल,' तर मूळ योजनेची आहे त्या स्वरुपामधे

अंमलबजावणी होईल. अशा योजनेसाठी त्या राज्याला केंद्रीय कायद्याच्या कालावधीइतकाच, म्हणजे १०० दिवसांसाठीचा निधी केंद्रशासनाकडून मिळणार आहे.

## रोहयो+राष्ट्रीय ग्रामीण रोहयो = महाराष्ट्र ग्रामीण रोहयो

केंद्रीय कायद्याचे पडसाद महाराष्ट्रात उमटले नसते तरच नवल. केंद्रीय कायदा अस्तित्वात येण्याआधीपासून पुनर्विलोकन समितीच्या माध्यमातून रोहयोत बदल करण्याची प्रक्रिया महाराष्ट्र राज्य शासनाने सुरू केलेलीच होती. रोहयोत कालानुरुप बदल करणे, त्यासाठी योजनेतील विसंगती दूर करणे, असे या प्रक्रियेचे उद्दिष्ट राज्यशासनाने मांडलेले आहे. (रोजगार हमी योजना, पुनर्विलोकन समितीचा अहवाल, एप्रिल २००५) केंद्रातील कायद्यामुळे[१] ही प्रक्रिया काहीशी थंडावली आणि केंद्रातील कायद्याशी रोहयोचा मेळ कसा घालायचा याचा विचार धोरणकर्त्यांनी सुरु केला.

याच वेळी, देशातील २०० मागास जिल्ह्यांमधे महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांची निवड होऊन या बारा जिल्ह्यांना राष्ट्रीय रोजगार हमी कायदा लागू होईल, असे केंद्र शासनाने जाहीर केले. या घडामोडींची परिणति २३ डिसेंबर २००५ रोजी महाराष्ट्र राज्यशासनाने काढलेल्या शासन निर्णयात झाली (शासन निर्णयासाठी कृपया परिशिष्ट १ पहावे).

## शासकीय दस्तावेजांतून होणारी योजनेची ओळख

'महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७' व 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५' या दोन्ही कायद्यांतील विसंगती दूर करुन व अधिक चांगल्या, आवश्यक बाबी एकत्र करुन 'महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना' (म.ग्रा.रोहयो) या नावाने एक 'सर्वंकष रोजगार हमी योजना' अमलात आणण्यात येईल, असे २३ डिसेंबर २००५ च्या शासन निर्णयात नमूद केलेले आहे. या नव्या योजनेखाली मजुरांना 'अधिकच्या सोयी–सवलती मिळत रहातील आणि रोहयोची अंमलबजावणी प्रभावी होईल,' असेही या शासन निर्णयात म्हटले आहे.

---

[१] या विधेयकाची हिंदी प्रत व त्याचा मराठी अनुवाद प्रयासकडे उपलब्ध आहे.

नवीन योजनेची व्याप्ती काय असेल; रचना कशी असेल; कोणती कामे योजनेखाली घेता येतील; नोंदणी, नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण–नियमन या प्रक्रिया कशा होतील, कोणत्या प्रशासकीय यंत्रणांच्या भूमिका कोणकोणत्या असतील, याची प्राथमिक मांडणी या शासन निर्णयात केली आहे.

राज्य शासनाने याच सर्व बाबी थोड्या विस्ताराने १६ जानेवारी २००६ रोजी काढलेल्या शासननिर्णयात नमूद केलेल्या आहेत, शिवाय रोहयोची व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (रा.ग्रा.रोहयो) तुलनात्मक मांडणीही या शासननिर्णयात केली आहे. (हा शासननिर्णय २३ डिसेंबर २००५ च्या शासननिर्णयाचीच विस्तारित आवृत्ती असल्यामुळे पुस्तिकेत समाविष्ट केलेला नाही.) या दोन शासन निर्णयांखेरीज नियोजन विभागाने विभागीय व जिल्हास्तरावरील प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाठवलेला कार्यवाहीबाबतच्या योजनेचा दस्तावेज इंग्रजीत असून, सार्वजनिक वितरणासाठी शासनाने उपलब्ध केलेला नाही.

या सर्व शासकीय दस्तावेजांतून होणारी योजनेची ओळख याप्रमाणे आहे –

## अ) योजनेची संरचना

**तक्ता क्र. १ – म. ग्रा. रोहयोची संरचना**

| **स्तर** | **यंत्रणा** | **जबाबदार अधिकारी** | **जबाबदारी** |
|---|---|---|---|
| **राज्य** | **राज्यस्तरीय रोजगार हमी समिती** | विधानमंडळ सदस्य | योजनेचे मूल्यमापन, योजनेतील त्रुटी व सुधारणांबाबत शासनाला शिफारसी |
| | **रोजगार हमी परिषद** | मुख्यमंत्री (अध्यक्ष), ग्रामीण विकास, जलसंधारण, कृषी व वन खात्यांचे मंत्री, म.ग्रा.रोहयोचे सर्व सचिव (सदस्य), रोहयो उपसचिव (परिषद–सचिव) | योजनेचे नियमन, मूल्यमापन, आणि राज्य शासनाला सल्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | **राज्य कार्यक्रम समन्वयक** | प्रधान सचिव, म.ग्रा. रोहयो | समन्वय, नियमन |
| विभाग | **विभागीय आयुक्तालय** | विभागीय आयुक्त | नियमन, देखरेख व ५० ते ७५ लाखापर्यंतच्या कामांना प्रशासकीय मंजुरी |
| जिल्हा | **जिल्हास्तरीय समिती** | जिल्हास्तरीय प्रशासकीय अधिकारी, मजूर प्रतिनिधी, स्त्रिया, अनुसूचित जाती–जमातींचे प्रतिनिधी | देखरेख, नियमन |
| | **जिल्हा समन्वय अधिकारी** | जिल्हाधिकारी | समन्वय, नियोजन, ५० लाखापर्यंतच्या कामांना प्रशासकीय मंजुरी |
| | **जिल्हा समन्वय सह अधिकारी** | मुख्य कार्यक्रम अधिकारी | समन्वय, नियोजन, |
| तालुका | **पंचायतस्तरीय रोहयो समिती** | जिल्हास्तरीय समितीप्रमाणे रचना | पंचायत क्षेत्रातील देखरेख–नियमन |
| | **गट कार्यक्रम अधिकारी** | निवृत्त तहसिलदार वा गटविकास अधिकारी (ग्रामीण भागाचा अनुभव असलेले) | ग्रामपंचायतींच्या नियोजनाला तांत्रिक, प्रशासकीय मंजुरी पंचायत समितीला शिफारसी, तक्रार निवारण |
| | **पंचायत समिती** | वरीलप्रमाणे | तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या कामांना मान्यता व जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांना सादरीकरण |
| गाव | **ग्रामपंचायत** | सरपंच, ग्रामसेवक, इतर सदस्य | ग्रामपंचायत क्षेत्रातील कामांसाठी नोंदणी, कामांचे नियोजन,कामांची अंमलबजावणी |

| | | | |
|---|---|---|---|
| | **ग्रामसभा** | ग्रापंचायतीप्रमाणे | कामांचे नियोजन, ग्रामपंचायत नियोजनाला मान्यता, लाभार्थीची शिफारस, सामाजिक लेखापरीक्षण |

म. ग्रा. रोहयोचा सर्व कारभार राज्यशासनाच्या नियोजन विभागाच्या अखत्यारीत येतो.

## ब) योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये

योजनेच्या संरचनेतून सूचित होणारी वैशिष्ट्ये अधिक नेमकेपणाने समजून घेण्यासाठी मूळ रोहयो (१९७७) आणि रा. ग्रा. रोहयो (२००५) यांच्या मिलाफातून म. ग्रा. रोहयो तयार झाली आहे हे लक्षात घ्यायला हवे. त्यासाठी अर्थातच १९७७ चा मूळ कायदा व २००५ चा राष्ट्रीय कायदा या दोन्ही कायद्यातील विसंगती आणि चांगल्या तरतुदींचा संदर्भ घ्यायला हवा. खाली दिलेल्या तक्त्यामध्ये मूळ रोहयो (१९७७ चा अधिनियम), राष्ट्रीय कायदा (२००५) चा अधिनियम आणि म. ग्रा. रोहयो यांच्या वैशिष्ट्यांची तुलनात्मक मांडणी केली आहे.

### तक्ता क्र. २ – तुलनात्मक मांडणी

| क्र. | वैशिष्ट्ये | मूळ रोहयो | रा.ग्रा.रोहयो | म. ग्रा. रोहयो |
|---|---|---|---|---|
| १ | **व्याप्ती** | संपूर्ण राज्य<br>संपूर्ण वर्षभर | देशातील २०० मागास जिल्हे, वर्षातील १०० दिवस | राज्यातील १२ जिल्हे वर्षातील १०० दिवस केंद्रीय निधीतून |
| २ | **निधीची तरतूद** | व्यवसाय कर व इतर अनुषंगिक करा एवढ्याच रक्कमेची राज्यशासनाकडून तरतूद | केंद्रशासनाकडून ३/४ व राज्य–शासनांकडून उर्वरित निधी; व्यवसाय/ अनुषंगिक करांची तरतूद नाही. | केंद्रशासनाकडून वेगळ्या निधीची तरतूद आहे परंतु उर्वरित जिल्ह्यांसाठी निधी कसा असेल याबाबत स्पष्टता नाही. |
| ३ | **बेरोजगार भत्ता** | प्रतिदिन प्रतिव्यक्ती दहा रुपये, जबाबदारी | पहिल्या १५ दिवसापासून ३० दिवसांपर्यंत किमान | रा. ग्रा. रोहयो प्रमाणेच |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | राज्यशासनावर | वेतनाच्या २५% आणि त्यानंतर ५०% जबाबदारी राज्यशासनावर | |
| ४ | **नोंदणी प्रक्रिया** | १८ वर्षावरील कोणीही व्यक्ती नोंदणीसाठी पात्र<br>तलाठी कार्यालयात नोंदणी<br>मजूर नोंदणी केल्या–नंतर मिळणारे ओळखपत्र नोंदणीनंतर पाच वर्ष वैध. | 'कुटुंब' हेच नोंदणीसाठी ग्राह्य<br>ग्रामपंचायतीच्या पातळीवर.<br>राज्याच्या योजनेप्रमाणेच | व्यक्ती व कुटुंब दोन्ही नोंदणीसाठी ग्राह्य<br>रा. ग्रा. रोहयोप्रमाणे |
| ५ | **मजुरीची पध्दत** | मजुरीचा दर राज्याच्या किमान वेतनानुसार | केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणेच ६० रु. | रा. ग्रा. रोहयोप्रमाणे |
| ६ | **कामाचे स्वरूप** | वैयक्तिक लाभाच्या योजनांची कामे काढण्याची अतिरिक्त तरतूद | वैयक्तिक लाभाच्या योजनांची तरतूद नाही | मूळ कायद्याप्रमाणे |
| ७ | **अंमल–बजावणी व नियमन यंत्रणा** | अंमलबजावणी जिल्हा पातळीवरून गावपातळीपर्यंत महसूल यंत्रणेतर्फे<br>जिल्हा पातळीवरील जिल्हाधिकारी या नियमनाचे प्रमुख<br>नियमनासाठी राज्य ते पंचायत स्तरावर स्वतंत्र समित्यांची नेमणूक | गट पातळीवरच स्वतंत्र गट कार्यक्रम अधिकाऱ्याची कंत्राटी पध्दतीने नेमणूक<br>जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या नियमन यंत्रणेचे प्रमुख<br>नियमनासाठी राज्य ते जिल्हा स्तरावर परिषदांची नेमणूक | रा. ग्रा. रोहयोप्रमाणे<br>राज्यस्तरीय परिषद व राज्य ते तालुका स्तरावर समित्या |
| ८ | **पंचायत** | तरतूद नाही | कामांचे नियोजन, आखणी, | रा. ग्रा. रोहयोप्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **राज यंत्रणेचा सहभाग** | | मंजुरी आणि नियमन यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या पंचायत राज संस्था | |
| ९ | **ग्राम–सभेची भूमिका** | ग्रामसभेला विशेष अधिकारांची तरतूद नाही | ग्रामसभेला कामे मंजूर करणे, कामांवर देखरेख करणे आणि सोशल ऑडिट करण्याचे अधिकार | रा. ग्रा. रोहयोप्रमाणे |
| १० | **दस्ता–वेजाचे संगणकी–करण** | मूळ कायद्यात तरतूद नाही | नोंदणीपासून अंमलबजावणीच्या सर्व तपशीलांचे संगणकीकरण करण्याची तरतूद | रा. ग्रा. रोहयोप्रमाणे |
| ११ | **मजुरांना सुरक्षितता व सुविधा** | औषध, पिण्याचे पाणी, सावली, पाळणाघर, मातृत्व रजा | मूळ कायद्याप्रमाणेच | मूळ कायद्याप्रमाणे |
| | | कामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यूस पन्नास हजार अनुदान | अनुदान रु. पंचवीस हजार | मूळ कायद्याप्रमाणे |
| १२ | **यंत्रवापर** | यंत्र वापर व कंत्राटदारांना परवानगी नाही | मूळ कायद्याप्रमाणे | मूळ कायद्याप्रमाणे |
| १३. | **कुशल : अकुशल प्रमाण** | जलसंधारण कामांसाठी ५१:४९ इतर : ६०:४० | ६० : ४० जिल्हास्तरावर | वर्गीकरण मूळ कायद्याप्रमाणे एकूण टक्केवारी रा. ग्रा. रोहयोप्रमाणे |

थोडक्यात म्हणजे, म. ग्रा. रोहयो ही नवीन स्वतंत्र योजना नसून मूळ रोहयोचे सुधारित व विस्तारित स्वरुप आहे. तक्ता क्र. दोनच्या, तसेच आधी नमूद केलेल्या शासननिर्णयांच्या आधारे म. ग्रा. रोहयोची प्रमुख वैशिष्ट्ये याप्रमाणे मांडता येतील :

## १) रोजगाराची हमी

तक्त्यावरुन दिसून येते त्याप्रमाणे मूळ रोहयो आणि राष्ट्रीय ग्रा.रोहयो यांच्यात बदल दोन प्रमुख स्तरावर आहेत. एक म्हणजे रा. ग्रा. रोहयोने 'हमी' फक्त वर्षातील शंभर दिवस मानलेली आहे. पण म. ग्रा. रोहयोने वर्षातील कितीही दिवस काम दिले जाईल, असे मूळच्या रोहयोनुसार मानले आहे. रा. ग्रा. रोहयोने कुटुंबाला एकूण शंभर दिवस हमी म्हणजेच कुटुंबातील काम करणाऱ्या सर्व व्यक्तींना मिळून १०० दिवसांची हमी दिली आहे, तर म. ग्रा. रोहयोने मूळ रोहयोनुसार कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला मागेल तेवढे दिवस कामाची हमी दिली आहे. परिणामी मूळ कायद्यातील हमी म. ग्रा. रोहयोतही सुरक्षित (निदान कागदोपत्री) राहिलेली आहे.

## २) किमान समान वेतन

मूळ रोहयोतील मजुरी महाराष्ट्राच्या किमान वेतनावर आधारित दरसूचीप्रमाणे दिली जाते, त्यामुळे सध्या एक ते चार या चार परिमंडळांसाठी रु. ४५, ४७, ४९ व ५१ असे दर प्रचलित आहेत. रा. ग्रा. रोहयोनुसार, 'केंद्रसरकारतर्फे वेळोवेळी स्वतंत्र सूचना काढून रोजगार हमीसाठी मजुरीचा दर निश्चित केला जाईल, मात्र हा दर कोणत्याही परिस्थितीत रु. साठ पेक्षा कमी नसेल. केंद्र सरकारने विहित केलेल्या दराच्या आधारे विविध राज्यांनी दर सूची तयार करावी. केंद्र सरकारकडून विहित दर निश्चित होईपर्यंतच्या काळात त्या-त्या राज्यातील किमान वेतन कायद्यानुसार रोजगार हमीची मजुरी दिली जावी.'

रा. ग्रा. रोहयोनुसार आतापर्यंत इतर अनेक राज्यांमधे रु. ७३ ते रु. १२५ पर्यंतची मजुरी राज्यशासनांनी निश्चित केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने या संदर्भात २८ डिसेंबर २००५ रोजी एक शासन निर्णय काढला आहे (शासन निर्णयासाठी कृपया परिशिष्ट २ पहावे). केंद्र शासनाने विहित केलेल्या रु. साठ किमान वेतनानुसार दरसूचीत रोहयोच्या मजुरीचा दर, परिमंडळाचा विचार न करता सरसकट रु. साठ असा होणार आहे, त्यामुळे आधीच्या दरपत्रकातील बहुतांश बाबींमधे तसे बदल

करावे लागतील, असे या शासननिर्णयात म्हटले आहे. दरपत्रकात सुधारणा करण्यासाठी पुणे, नागपूर व अमरावती येथील विशेष कार्य अधिकाऱ्यांची त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली असून, या समितीने आपला अहवाल शासनाला दि. १० जानेवारी २००६ पर्यंत जाहीर करायचा आहे. केंद्रशासनाने महाराष्ट्र राज्यासाठी रु. ६० हा रोहयोचा किमान मजुरी दर म्हणून लागू करण्यात यावा अशी सूचना जारी केल्यानंतर महाराष्ट्रात सगळीकडे रु. ६० दर लागू होईल असे हा शासननिर्णय सांगतो. स्त्री–पुरुषांसाठी हा दर सारखाच असणार आहे.

'अपुरी मजुरी' ही रोहयोवर काम करणाऱ्या मजुरांची अतिशय महत्त्वाची तक्रार आहे, हे लक्षात घेता तर किमान वेतनातील हा संभाव्य बदल निश्चितच महत्त्वाचा म्हटला पाहिजे.

### ३) रोजगाराची हमी – बेरोजगार भत्ता

रोजगाराची हमी प्रत्यक्षात आणण्यासाठी बेरोजगार भत्त्याची तरतूद हे खरे महत्वाचे कलम आहे. मूळ रोहयोप्रमाणेच, म. ग्रा. रोहयोमधे काम मागितल्यावर पंधरा दिवसात काम उपलब्ध करून न दिल्यास बेरोजगार भत्ता मिळणे अपेक्षित आहे. मात्र मूळ रोहयोतील प्रतिदिन रु. १० या दरापेक्षा म. ग्रा. रोहयोतील बेकारभत्त्याचा दर रा. ग्रा. रोहयोप्रमाणे वाढवण्यात आला आहे. तो याप्रमाणे – पहिल्या तीस दिवसांकरिता किमान मजुरीच्या २५% आणि त्यानंतरही काम सुरू न झाल्यास उरलेल्या दिवसांसाठी किमान मजुरीच्या ५०%, म्हणजे किमान रु. ६० वेतन असल्यास पहिल्या तीस दिवसांसाठी प्रतिदिन रु. १५ व उरलेल्या दिवसांसाठी प्रतिदिन रु. ३० असा दर असेल.

### ४) ग्रामपंचायत व ग्रामसभेला अधिकार

मूळच्या रोहयोत ग्रामसभेला व ग्रामपंचायतीला जवळ जवळ नगण्यच स्थान होते. रोहयो हा १९७८ सालचा कायदा. त्यानंतर चौदा वर्षांनी पंचायती राजचा कायदा अस्तित्वात आला. या ७३ व्या घटना दुरुस्तीने ग्रामसभा व ग्राम पंचायतींना खऱ्या अर्थाने लोकशाही अनुभवायला मिळायला लागली. रा. ग्रा. रोहयो कायद्यात

याला योग्य स्थान दिलेले आहे. नियोजन, अंमलबजावणी व निधी वाटपात आता ग्रामसभा व ग्रामपंचायतीला महत्त्वाची भूमिका मिळाली आहे. रा. ग्रा. रोहयोतील ही तरतूद म. ग्रा. रोहयोतही करण्यात आली आहे. हा अतिशय महत्त्वाचा बदल आहे. याच्याच जोडीला राष्ट्रीय कायद्याने ग्रामसभेला social audit म्हणजेच सामाजिक लेखापरीक्षण करण्याचा कायदेशीर अधिकार दिल्याने, ग्रामसभेच्या हाती योजनेवर अंकुश ठेवण्यासाठी धारदार हत्यार मिळाले आहे. मूळ रोहयोत ही तरतूद नसली तरीही म. ग्रा. रोहयोमधे ही तरतूद स्वीकारण्यात आली आहे.

### ५) निधीचे दोन स्रोत

म. ग्रा. रोहयोच्या १२ जिल्ह्यांमध्ये १०० दिवसांसाठी निधीची तरतूद केंद्र शासनाकडून तर उरलेल्या २६५ दिवसांसाठीची, तसेच वर्षभरातील रोहयोअंतर्गत घेता येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी निधीची तरतूद राज्यशासनाकडून होणार आहे. त्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी १०० दिवसांच्या नोंदी स्वतंत्रपणे व विहित नमुन्यात भरायच्या आहेत. महाराष्ट्रात रोहयो निधीची तरतूद या बदलामुळे अधिकच भरभक्कम होणार आहे.

### ६) अकुशल : कुशल प्रमाण व कंत्राटदारी

रा. ग्रा. रोहयोप्रमाणेच म. ग्रा. रोहयोत जिल्हा पातळीवर अकुशल : कुशल हे प्रमाण ६० : ४० आहे, तर सध्याच्या रोहयोप्रमाणे त्यात ग्रामपंचायत व पंचायत स्तरावर जलसंधारणाच्या कामांसाठी ५१ : ४९, व इतर सर्व कामांना ६० : ४०, असा बदल केला आहे. मात्र मूळ कायदा व त्यावर आधारित असलेल्या रा. ग्रा. रोहयोप्रमाणेच जास्तीत जास्त काम अकुशल व यंत्रांचा वापर न करता, मजुरांच्या श्रमातून व कंत्राटदारीवर बंदी घालून केले जावे असे म. ग्रा. रोहयोतही अपेक्षित आहे.

### ७) दस्तावेजाचे संगणकीकरण

रा. ग्रा. रोहयोप्रमाणेच म. ग्रा. रोहयोतही सर्व दस्तावेजांचे संगणकीकरण होणार आहे, त्यामुळे. म. ग्रा. रोहयोबाबतची सर्व माहिती सहजपणे उपलब्ध व खुली होणे अपेक्षित आहे.

## ८) अंमलबजावणीत अशासकीय संस्थांना भूमिका

ग्रामपंचायतीतील विविध खात्यांबरोबरच स्वयंसेवी क्षेत्रातील अशासकीय संस्थांनाही म. ग्रा. रोहयोतील कामांच्या अंमलबजावणीचा अधिकार मिळालेला आहे. त्यांनाही 'अंमलबजावणी यंत्रणेचा' दर्जा देण्यात आला आहे.

## ९) कामाच्या ठिकाणी सोयी-सवलती व संरक्षक तरतुदी

रा. ग्रा. रोहयोतील सोयी, सवलती व संरक्षक तरतुदी मूळ रोहयोनुसार आहेत. म. ग्रा. रोहयोसाठीही या सर्व सोयी-सवलती, संरक्षक तरतुदी लागू झालेल्या आहेत.

एखाद्या मजुरास कामावर असताना मृत्यू आल्यास, मूळ रोहयोप्रमाणेच शासनाकडून, रुपये पन्नास हजार (रु. ५०,०००) एवढे अनुदान मिळू शकते. रा. ग्रा. रोहयोमधे मात्र ही रक्कम रु. पंचवीस हजार (रु. २५०००) एवढीच आहे. या शिवाय, कामावर असताना अपघात झाल्यास त्या मजुराचा सर्व औषध खर्च व जेवढे दिवस दवाखान्यात जावे लागले त्या दिवसांची अर्धी मजुरीही मूळ रोहयोप्रमाणेच मिळू शकते.

■ ■ ■

# योजनेची कारभार प्रक्रिया

योजनेच्या प्रमुख वैशिष्ट्यांवरून दिसते त्याप्रमाणे म. ग्रा. रोहयोची कारभार प्रक्रिया काही बाबतीत मूळ रोहयोपेक्षा वेगळी असणार आहे. या वेगळेपणामुळेच गावपातळीवर मजुरांमधे, कार्यकर्त्यांमधे, एवढेच नव्हे, तर नव्यानेच योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायत व तालुका स्तरावरील प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमधेही संभ्रमाचे आणि गोंधळाचे वातावरण दिसते. हे वेगळेपण नक्की कशा–कशात आहे? योजनेच्या कारभार–प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर, म्हणजे नोंदणी, मागणी, नियोजन, अंमलबजावणी आणि संनियंत्रण–नियमन या सर्व टप्प्यांवर हे वेगळेपण आपल्याला दिसते. जसे की –

**नोंदणीच्या टप्प्यावर:** मूळ रोहयोत वापरला जाणारा नमुना क्र. १ चा अर्ज किंवा साधा कागद वापरून म. ग्रा. रोहयोसाठी नोंदणी करायची आहे. ही नोंदणी कुटुंबाला एकत्रितपणे, तसेच कोणत्याही ग्रामीण प्रौढ व्यक्तीला स्वतंत्रपणे करता येणार आहे. नोंदणी कुटुंबाने एकत्रितपणे केली असेल तर काम करू इच्छिणाऱ्या कुटुंबियांची नावे, वय, लिंग, जात/जमात इ. माहितीही अर्जात नोंदवणे गरजेचे आहे. स्वतंत्रपणे अर्ज केल्यास देखील हा तपशील भरावा लागणार आहे. गरजू व्यक्तींची नोंदणी व्हावी यासाठी ग्रामपंचायतीने सरपंच, गावातील स्त्री सदस्य व अनुसूचित जाती/जमातींचे प्रतिनिधी यांच्यामार्फत घरोघर जाऊन सर्वेक्षण करायचे आहे आणि गरजू कुटुंबाची नावे निश्चित करण्यासाठी ग्रामसभाही बोलवायची आहे.

रोजगारपत्रक आणि जॉब कार्ड (कुटुंब ओळखपत्रक) मिळणे, या नोंदणी होण्यातील महत्वाच्या पायऱ्या आहेत. नोंदणी अर्ज ग्रामपंचायतीत ग्रामसेवकाकडे अथवा सरपंचांकडे दाखल केल्यावर एका आठवड्यात ग्रामपंचायतीने त्या त्या कुटुंबाला **जॉब कार्ड** द्यायचे आहे. जॉब कार्डवर त्या कुटुंबाचा नोंदणी क्रमांक लिहिलेला असेल आणि काम

करू इच्छिणाऱ्या कुटुंबांतील सदस्यांचे (अथवा व्यक्तीचा) फोटो जोडलेले असतील. या फोटोचा खर्च ग्रामपंचायतींनी रोहयो निधीतून करायचा आहे. जॉब कार्डची एक प्रत कुटुंबाकडे तर दुसरी प्रत ग्रामपंचायतींकडे असणे अपेक्षित आहे. नोंदणी अर्ज दाखल केल्यापासून एका आठवड्यात जॉब कार्ड दिले जाणे अपेक्षित आहे. या सात दिवसात ग्रामपंचायतींनी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची यादी, मतदार यादी इ. वापरून नोंदणी अर्जाची वैधता तपासायची आहे. हे जॉब कार्ड एकूण पाच वर्षांसाठी वैध असेल. दरवर्षी ग्रामपंचायतींनी गावातील स्थलांतराचा काळ लक्षात घेऊन जॉब कार्डस्ची यादी अद्ययावत ठेवायची आहे व ती गट कार्यक्रम अधिकाऱ्यांना दर वर्षी ऑक्टोबर महिन्यात सादर करायची आहे. जॉब कार्ड न मिळाल्यास कुटुंब अथवा व्यक्तीला गट कार्यक्रम अधिकारी किंवा जिल्हा समन्वयकांकडे तक्रार नोंदवता येते. या तक्रारीचे निवारण १५ दिवसांमधे होणे अपेक्षित आहे. (जॉब कार्डच्या नमुन्यासाठी कृपया परिशिष्ट २ पहा.)

**रोजगार पत्रक (एम्प्लॉयमेंट कार्ड)**: नोंदणी केलेल्या प्रत्येक अर्जदाराला जॉब कार्डबरोबरच रोजगार पत्रकही मिळणे अपेक्षित आहे. हे रोजगार पत्रक व जॉब कार्ड हरवल्यास ग्रामपंचायतीकडे अर्ज करून त्याची दुसरी प्रतही मिळू शकते. या रोजगार पत्रकात कुटुंबाचा नोंदणी क्रमांक, नोंदणीचे वर्ष, तसेच ग्रामपंचायतीचा संकेतांक इ. तपशील असतात. (रोजगार पत्रकाच्या नमुन्यासाठी कृपया परिशिष्ट ३ पहा.)

**मागणीच्या टप्प्यावर:** मूळ रोहयोप्रमाणेच 'नोंदणी' व मागणीसाठी दोन स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. मागणी अर्ज मूळ रोहयोच्या नमुना ४ मधे, तसेच साध्या कागदावरही करता येईल. मात्र त्यासाठी मागणी करणाऱ्या व्यक्तीने अथवा गटाने ग्रामपंचायतीमधे नोंदणी केलेली असली पाहिजे. मागणी अर्जामधे जॉब कार्डवरील नोंदणी क्रमांक आणि काम कोणत्या तारखेपासून व किती दिवस हवे आहे किंवा वर्षातील कोणकोणत्या काळात किती दिवस हवे आहे हे लिहिणे गरजेचे आहे. हे न लिहिल्यास 'तपशील नाही, म्हणून काम नाही', असे कारण देऊन ग्रामपंचायती काम काढणे नाकारण्याची शक्यता असते. मागणीचा अर्ज दाखल केल्यावर ग्रामपंचायतीकडून त्याची पोच घेणे अतिशय महत्वाचे आहे. ही पोच मूळ रोहयोतील नमुना क्र. ५ मधे दिली जाणे अपेक्षित आहे. ही पोच/पावती हा कामाच्या मागणीचा आग्रह धरण्यासाठी, तसेच काम

न मिळाल्यास बेकारभत्ता मिळण्यासाठी महत्त्वाचा पुरावा ठरू शकतो. मागणी अर्ज दाखल केल्यानंतर १५ दिवसात काम काढणे ग्रामपंचायतीसाठी बंधनकारक आहे. हे काम शक्यतो ५ कि.मी.च्या परिसरात व शक्य नसल्यासच तालुक्यामधे काढले जावे, असे कायदा सांगतो. मूळ रोहयोप्रमाणेच, ५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर काम दिले गेल्यास मजुरीच्या १०% रक्कम जादा रक्कम म्हणून दिली जाणे अपेक्षित आहे. मागणी करणाऱ्या मजुरांनी सलग १४ दिवस काम करणेही कायद्याने बंधनकारक केले आहे.

**कामांच्या नियोजनाच्या टप्प्यावर:** रा. ग्रा. रोहयोसाठी विहित केलेली सर्व कामे तर म. ग्रा. रोहयोखाली घेता येतीलच, शिवाय मूळ रोहयोतील वैयक्तिक लाभाच्या योजनाही म. ग्रा. रोहयोखाली राबवता येतील. त्यामुळे <u>म. ग्रा. रोहयोखाली खालील प्रकारच्या कामांचे नियोजन करता येईल :</u>

१) जलसंधारण व जलसंवर्धन कामे : मातीचे बांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम माऊंट, सामूहिक शेत तळे, मातीचे धरण, साठवण तलाव, पाझर तलाव, पाझर कालवे, गाव तलाव, भूमिगत बंधारा, वन तलाव, बोडी नूतनीकरण.

२) दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित) : पडीक जमिनीवर वृक्ष लागवड, रस्त्याच्या बाजूला वृक्ष–लागवड, रोप–वाटिका वृक्ष लागवड, जाळ रेषांची कामे, बांबू–रांझ्या भोवती वर्तुळाकार चर काढणे, वृक्ष–लागवड.

३) जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सूक्ष्म जलसिंचनाची कामे) : मातीचे कालवे, कालव्याचे नूतनीकरण.

४) अनुसूचित जाती/जमाती, नवीन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे.

५) पारंपारिक पाणीसाठ्यांच्या योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे: तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण करणे व जुन्या वन तलावाचे नूतनीकरण करणे.

६) भूविकासाची कामे

७) पूरनियंत्रण व पूरसंरक्षकाची कामे : पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे, खार जमीन विकास बंधारे.

८) ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे : जिल्हा रस्ते, गाव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, शेत रस्ते, स्मशान भूमी व पाणी पुरवठा इत्यादींना जोडणारे रस्ते, रस्त्यांचे नूतनीकरण, रस्त्यांचे रुंदीकरण.

९) या शिवाय मूळच्या रोहयोतील वैयक्तिक लाभाची कामे म्हणजे जवाहर विहीरी, खाजगी जमिनींवर फलोत्पादन, वृक्ष लागवड अशी कामेही घेता येतील.

**नियोजन कोणी कसे करायचे?**

**ग्रामपंचायत स्तरावर:** नियोजन व अंमलबजावणीसाठी गाव हा घटक मानलेला आहे आणि म्हणून ग्रामपंचायतीला कायद्याने नियोजनाचे अधिकार दिलेले आहेत.

आपल्या गावाच्या विकासासाठी कोणती कामे घेतली जावीत याचे नियोजन ग्राम पंचायतीने करायचे आहे. कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे याचा निर्णयही ग्रामपंचायतीने घ्यायचा आहे. या कामांचा तांत्रिक आराखडा तयार करुन प्रशासकीय, वित्तीय मंजुरीसाठीची प्रक्रिया त्या त्या विभागामार्फत ग्रामपंचायतीने करवून घ्यायची आहे. त्यासाठी दरवर्षी रोहयोचा वार्षिक नियोजन आराखडाही तयार करायचा आहे. त्यासाठी वेळोवेळी ग्रामसभा घेऊनच हे नियोजन निश्चित करायचे आहे.

कामाची मागणी येईल तेव्हा काही मंजूर झालेली कामे तयार असतील व ती मागणीप्रमाणे पंधरा दिवसांत सुरू करताही येतील, अशा रीतीने नियोजन होणे गरजेचे आहे. हे नियोजन तयार नसेल तर विभागाकडे जे नियोजन त्या गावासाठी तयार असेल, त्याप्रमाणे कामे काढली जातील. बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार योजनेतील कामांच्या खर्चाचा किमान पन्नास टक्के निधी, ग्राम पंचायतींना थेटपणे मिळू शकतो. या कामांच्या अंमलबजावणीची जबाबदारी पूर्णपणे ग्राम पंचायतीची असणार आहे.

**तालुका स्तरावर:** ग्राम पंचायतीने तालुका स्तरावरील 'गट कार्यक्रम अधिकारी' यांच्याबरोबर या योजनेसाठीचे काम करावयाचे आहे. गट कार्यक्रम अधिकाऱ्याने विविध गावांतील मागणी व वेगवेगळ्या विभागांकडे असलेल्या नियोजन आराखड्यातील कामांचा समन्वय साधायचा आहे. ग्रामपंचायतीने सुचविलेल्या कामांची तांत्रिक तपासणी करून त्यांच्याबाबतची निरीक्षणे पंचायत समितीकडे सादर करण्याची जबाबदारी गट कार्यक्रम अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. पंचायत समितीने गट कार्यक्रम अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल पाठवायचा आहे, त्याआधी ग्रामपंचायत व इतर अंमलबजावणी यंत्रणांकडून आलेल्या प्रस्तावांना मंजुरीही द्यायची आहे.

**जिल्हा स्तरावर:** तालुका पातळीवरील गट कार्यक्रम अधिकारी यांनी तालुका पातळीवरील विविध विभागांशी संबंध ठेवायचा आहे तसेच जिल्ह्याच्या कार्यक्रम समन्वय अधिकाऱ्यांशी समन्वय साधायचा आहे. संपूर्ण जिल्ह्यासाठी या योजनेचे समन्वयन करण्याची जबाबदारी जिल्हा कार्यक्रम समन्वयन अधिकारी यांची, म्हणजेच जिल्हाधिकाऱ्यांची आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातून हे समन्वयाचे कामकाज चालणार आहे.

पंचायत समित्यांकडून आलेले आराखडे व जिल्ह्यातील रोजगाराची गरज आणि मजुरांची उपलब्धता यांचा विचार करुन जिल्हाधिकाऱ्यांनी वार्षिक आराखडा तयार करुन त्यास जिल्हा परिषदेकडून मान्यता घ्यायची आहे.

जिल्ह्याकडून राज्यात, नियोजन विभागाला आवश्यक अशी आकडेवारी, निधीची उपलब्धता, कामांची/मजुरांची मागणी व उपलब्धता इ. माहिती संकलित करून पाठविण्याची जबाबदारीही या कार्यालयावर आहे. ही माहिती सर्वसामान्यांसाठीही खुली करणे अपेक्षित आहे.

**अंमलबजावणीच्या टप्प्यावर:** काम सुरू होऊन मजुरी मिळण्यापर्यंतची प्रक्रिया म. ग्रा. रोहयोसाठी मूळ रोहयो कायद्याप्रमाणेच आहे. महत्त्वाचा बदल त्यातील ग्रामपंचायत व ग्रामसभेच्या भूमिकेचा आहे. कोणती कामे कोठे सुरू आहेत, त्यात

किती मजुरांना किती काळासाठी रोजगार मिळतो आहे, याची माहिती ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्या माध्यमातून तसेच सार्वजनिक ठिकाणी प्रसिद्ध करायची आहे. कामाच्या ठिकाणी मजुरीचे दर, मोजमापाची पद्धत याची माहिती रोहयोप्रमाणेच, मात्र आता ग्रामपंचायतीने लावायची आहे. झालेल्या कामाचे मोजमाप मस्टर बंद केल्यानंतर दोन–तीन दिवसातच करायचे आहे, जेणेकरून मजुरी काम पूर्ण झाल्यापासूनच्या पंधरवड्यात होऊ शकेल.

### संनियंत्रण आणि नियमनाच्या टप्प्यावर

### समित्या

मूळ रोहयो आणि रा. ग्रा. रोहयोतील निवडक तरतुदींचा म. ग्रा. रोहयोत समावेश केलेला आहे. तक्ता क्र.१ मधे दिल्याप्रमाणे संनियंत्रणासाठी म. ग्रा. रोहयोत मूळ रोहयोप्रमाणेच राज्यस्तरापासून तालुकास्तरापर्यंत विविध समित्यांची तरतूद करण्यात आली आहे. या समित्यांनी, तसेच जिल्हाधिकारी, गटकार्यक्रम अधिकारी आणि विभागीय आयुक्त यांनी वेळोवेळी रोजगार हमीच्या कामांना प्रत्यक्ष भेटी देऊन देखरेख ठेवायची आहे आणि योजनेचे नियमन करायचे आहे. कामांच्या तांत्रिक गुणवत्तेसाठी मुख्य अभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्या सहभागाने 'दक्षता पथकांनीही कामांची तपासणी करणे' मूळ रोहयोच्या धर्तीवर अपेक्षित आहे.

### तक्रार निवारण मंच

जिल्हाधिकारी आणि गट कार्यक्रम अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समितीमधे एक तक्रारपेटी ठेवायची आहे. ही तक्रारपेटी नियमितपणे उघडून त्यातील तक्रारींचे तातडीने निवारण करायचे आहे. या तक्रार निवारणाचे अहवालही जिल्हाधिकाऱ्यांनी नियोजन विभागाला नियमितपणे पाठवायचे आहेत. ग्रामपंचायत स्तरावरील तक्रारी पंचायत व जिल्हा स्तरावर पोचाव्यात यासाठी ग्रामसभेने गटकार्यक्रम अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जनसुनावण्या घ्यायच्या आहेत.

समित्या आणि 'तक्रार–निवारण मंचाशिवाय ग्रामसभेला सामाजिक लेखापरीक्षण (social audit) करण्याचा अधिकार' ही नियमनासाठीची अतिशय प्रभावी तरतूद रा. ग्रा. रोहयोच्या धर्तीवर म. ग्रा. रोहयोतही केलेली आहे.

## सामाजिक लेखापरीक्षण

'सामाजिक लेखापरीक्षण करण्याचा अधिकार' हे ग्रामसभेच्या हातातील 'हत्यार' आहे, याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे, सामाजिक लेखापरीक्षण ही 'कधी तरी एकदा' घडणारी घटना नाही, तर 'सातत्याने घडणारी प्रक्रिया' असणे अपेक्षित आहे. एकूण चार टप्प्यांमधे ग्रामसभेने सामाजिक लेखापरीक्षण करायचे आहे: कामे सुरू होण्याआधीचा नोंदणीचा टप्पा, कामांचे नियोजन, कामांची अंमलबजावणी आणि कामे पूर्ण होऊन मंजुरी दिल्यानंतर नियमन व मूल्यमापनाचा टप्पा. ही प्रक्रिया याप्रमाणे घडणे अपेक्षित आहे:

- नियोजनपूर्व टप्प्यामधे ग्रामसभेला गरजू लाभार्थींची नावे सुचवण्याचा अधिकार आहे, तर प्रत्यक्ष नियोजनाच्या टप्प्यात कोणती कामे घेतली जावीत हे ठरवण्यासाठी ग्रामसभा बोलावणे ग्रामपंचायतींना बंधनकारक आहे.
- अंमलबजावणीच्या टप्प्यात ग्रामसभेने स्त्रिया व अनुसूचित जाती/जमातींना पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल, अशी एक 'स्थानिक दक्षता आणि नियमन समिती' निवडून द्यायची आहे. अंमलबजावणी यंत्रणांनी प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक, वेळापत्रक आणि त्याच्या गुणवत्तेचे निकष याबाबत ग्रामसभेचा सल्ला आणि मंजुरी घ्यायची आहे. कामे पूर्ण झाल्याच्या दाखल्याबरोबरच, या स्थानिक दक्षता समितीचा 'काम पूर्ण व योग्य गुणवत्तेचे आणि न्याय्य पद्धतीने झाल्याचा' दाखलाही अहवालाला जोडलेला असणे अपेक्षित आहे. हा अहवाल तयार झाल्यावर ग्रामपंचायत आणि पंचायत समितीच्या पुढच्या बैठकीत मांडला जाणे अपेक्षित आहे. या अहवालाची एक प्रत गट कार्यक्रम अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनाही मिळाली पाहिजे.
- मजुरांच्या गरजांना पुरेपूर प्रतिनिधित्व मिळावे, म्हणून 'रोजगार हमीचे काम करणाऱ्या मजुरांची लाभार्थी–दक्षता समिती तयार करण्याची जबाबदारी गट कार्यक्रम अधिकाऱ्यांनी घ्यायची आहे.
- दर तीन महिन्यांनी ग्रामपंचायतीने महत्त्वाच्या नोंदी आणि कागदपत्रे ग्रामसभेत सादर करायची आहेत.

- योजनेबाबतची माहिती मजुरांपर्यंत पोचावी यासाठी गट कार्यक्रम अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती–फलकावर दर महिन्याला माहिती प्रसिद्ध करायची आहे. ही सर्व माहिती सातत्याने संकेतस्थळांवर (वेबसाईट) नोंदवली जाणे अपेक्षित आहे.
- सामाजिक लेखापरीक्षणाची प्रक्रिया प्रभावीपणे व्हावी यासाठी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना, त्याचप्रमाणे गावकऱ्यांना 'सामाजिक लेखापरीक्षणाचे' तसेच 'माहितीचा अधिकार वापरण्याचे' प्रशिक्षण देण्याची तरतूदही कायद्याने केली आहे.
- सामाजिक लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेतून पुढे आलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी 'हेल्पलाईन' सुरू करणे, 'नागरिकांच्या हक्कांची सनद' प्रसारित करणे असेही काही अभिनव उपक्रम शासनाच्या ९ जानेवारी २००६ रोजी प्रसृत केलेल्या इंग्रजी दस्तावेजात सुचवलेले आहेत.
- सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेतून आलेल्या तक्रारींवर गट कार्यक्रम अधिकारी, तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करायची आहे आणि या कार्यवाहीचे अहवाल पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेत सादर करायचे आहेत. ग्रामसभेच्या सामाजिक लेखापरीक्षण अहवालांचे संकलन व त्यावर कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात एक 'अंतर्गत लेखा–परीक्षण कक्ष' तयार होणे अपेक्षित आहे. आधी नमूद केलेली कार्यवाही या कक्षांमार्फत होणे अपेक्षित आहे.
- सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेबरोबरच म. ग्रा. रोहयोतील सर्व कामांचे सनदी हिशेबनीस अधिकाऱ्यांकडून (CA) लेखा–परीक्षण (auditing) होणेही बंधनकारक आहे.
- रोजगार हमीच्या लेखा–परीक्षणाबाबतचे सर्व अहवाल राज्यशासनापर्यंत पोचणे अपेक्षित आहे. राज्यशासनानेही या अहवालांवर आवश्यक कार्यवाही तातडीने करायची आहे.

- दरवर्षी ३१ डिसेंबरपर्यंत राज्य रोजगार हमी परिषदेने म. ग्रा. रोहयोचा वार्षिक अहवाल विधिमंडळात सादर करायचा आहे, त्यासाठी रोजगार हमीच्या वर्षभरातील अंमलबजावणीचा आढावा या परिषदेने घ्यायचा आहे.

थोडक्यात, राज्यस्तरापासून ग्रामपंचायत स्तरापर्यंतच्या प्रत्येक संबंधित शासकीय यंत्रणेने म. ग्रा. रोहयोचा कारभार पारदर्शक, जाबदायी जबाबदारी घ्यायची आहे. ग्रामसभेला आणि रोजगार हमीवर काम करणाऱ्या मजुरांना या प्रक्रियेत निर्णायक स्थान असणे अपेक्षित आहे.

■ ■ ■

# नव्या संधी आणि आव्हाने

म. ग्रा. रोहयोची कारभार–प्रक्रिया बघितली तर लक्षात येते की मूळ रोहयोची ताकद वाढवण्याच्या नव्या संधी म. ग्रा. रोहयोतील विविध तरतुदींच्या निमित्ताने खुल्या झाल्या आहेत. मूळ रोहयोत जशा कायद्यानेच योजना पारदर्शक आणि जाबदायी बनवण्याच्या जागा निर्माण केल्या होत्या, तशाच जागा म. ग्रा. रोहयोतील तरतुदींमुळे निर्माण झालेल्या दिसतात. मूळच्या रोहयोतील अशा जागांची ताकदही त्यामुळे वाढलेली दिसते. म. ग्रा. रोहयोच्या नियोजनपूर्व टप्प्यापासून ते मूल्यमापनापर्यंत ग्रामपंचायतीला आणि ग्रामसभेला निर्णायक भूमिका कायद्यानेच दिलेली आहे, ही त्यातील सर्वात महत्वाची जागा, सर्वात ताकदीची 'जागा'. ही संधी वापरून रोहयो मजुरांना, जनसंघटनांना, एवढेच नव्हे तर सर्वसामान्य जागरुक नागरिकांना किती तरी प्रश्न विचारता येणार आहेत. उदाहरणार्थ–

- गट कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या आहेत का?
- जिल्हाधिकारी आणि गट कार्यक्रम अधिकाऱ्यांनी तक्रारपेट्या ठेवल्या आहेत का? नसतील तर त्या कधी ठेवल्या जाणार आहेत?
- तालुक्यापासून राज्यपातळीवरील रोजगार हमी समित्या स्थापन झाल्या आहेत का? किमान आपल्या तालुक्यातील रोजगार हमी समितीवरचे सदस्य कोण आहेत? या समित्या अस्तित्वातच नसल्या, तर का? त्या कधी नेमल्या जाणार आहेत?
- आपल्या भागातील कोणत्या लोकप्रतिनिधींचा या समित्यांमधे सहभाग आहे? त्यांना त्या भागातील रोजगार हमीची, तसेच मजुरांच्या प्रश्नाची किती माहिती आहे? त्यांनी किती भेटी आतापर्यंत रोजगार हमीच्या कामांना दिल्या आहेत?

- ग्रामपंचायतींमध्ये कोणती कागदपत्रे पहाण्यासाठी खुली आहेत?
- किती ठिकाणी नोंदणी–मागणी व काम सुरू करण्याची प्रक्रिया कायद्याप्रमाणे झाली आहे?

प्रश्नांची ही यादी कितीही मोठी होऊ शकते. 'माहितीच्या अधिकाराचे' साधन वापरले तर या प्रश्नांची धार आणि ताकद अनेकपटींनी वाढू शकते. या आणि अशा प्रश्नांच्या निमित्ताने आपापल्या भागातील रोजगार हमीच्या दुर्लक्षित प्रश्नांना वाचा फुटू शकते. मात्र हे सहजासहजी होणार नाही, नव्या संधींबरोबर नवीन आव्हानेही येणारच. नव्या आव्हानांबरोबर जुनी आव्हानेही कदाचित अधिकच बिकट होणार. काय असतील ही आव्हाने?

- यापूर्वीही वारंवार समोर आलेले व्यापक पातळीवरचे आव्हान, अर्थातच 'कागदावर लिहिलेले प्रत्यक्षात आणणे!' या आव्हानाला तोंड देण्यासाठी योजनेने निर्माण केलेल्या संधी कोणत्या, हे समजून घेणे, आणि मग त्या वापरण्याची मोठ्या प्रमाणावर सुरुवात करणे अनिवार्यच आहे.
- प्रशासकीय यंत्रणेचा विविध पातळ्यांवरचा भ्रष्टाचार आणि जोडीला अनास्था, राजकीय पुढाऱ्यांचे हितसंबंध, हेही आपणा सर्वांना अतिपरिचित झालेले आव्हान. आधी मांडलेले प्रश्न, हे या आव्हानाला तोंड देण्याचा मार्ग दाखवू शकतात. या प्रश्नांमुळे परिस्थिती एका दिवसात बदलणार नाही हे तर खरेच, पण परिस्थिती बदलण्याचा रेटा निर्माण व्हायला मात्र निश्चितच मदत होईल असे वाटते. संवेदनशील शासकीय अधिकाऱ्यांच्या तसेच लोकप्रतिनिधींच्या कर्तृत्वाला त्यामुळे निश्चितच पाठबळ मिळू शकेल. असे प्रश्न राज्याच्या काना–कोपऱ्यातून सातत्याने विचारले गेले, तर मद्दड आणि स्वार्थी हितसंबंधांत गुंतलेल्या प्रशासकीय–राजकीय यंत्रणेच्या अभेद्य कवचाला तडे जाण्याची निदान सुरुवात तरी होऊ शकते.
- ग्रामसभांची ताकद वाढवणे हे पुन्हा एकदा नव्याने पुढे आलेले आव्हान. त्यासाठी ग्रामसभांच्या सक्षमीकरणाचे जागरूक प्रयत्न करायला हवेत.

पंचायतराजच्या आधीच्या अनुभवातून दिसते त्याप्रमाणे 'प्रत्यक्ष करण्यातूनच' ही ताकद वाढत असते. जिथे शक्य असेल तिथे रोजगार हमीच्या अंमलबजावणीच्या एखाद्या तरी टप्प्यावर आपण ग्रामसभेतून सामाजिक लेखापरीक्षण करण्याचा आग्रह धरू शकतो, तो पार पाडू शकतो. अशा अनुभवांतूनच 'रोजगार हमीचे सामाजिक लेखापरीक्षण कसे करायचे' याच्या पद्धती विकसित होतील. सामाजिक लेखापरीक्षण ही सातत्याने चालवायची प्रक्रिया असल्यामुळे ग्रामसभेची ताकद वाढवणे ही देखील सातत्याने चालू असणारी प्रक्रिया होऊ शकते.

- ग्रामपंचायत – ग्रामसभेच्या सहभागातून वंचित घटकांना प्राधान्याने उपयोगी पडतील अशी कामे होणे, हे म. ग्रा. रोहयोबरोबर नव्याने आलेले आव्हान. एकीकडे सध्याच्या रोहयोत, जोजोबा लागवड, द्राक्ष, जट्रोफा लागवड अशी 'नाविन्यपूर्ण' कामे जाहीर होत आहेत. या कामांचा अल्पभूधारक शेतकऱ्यांना वा दलित आदिवासी भूमिहीनांना थेट फायदा काय होणार, हा विचार कुठेच दिसत नाही. मोठ्या शेतकऱ्यांना वा प्रस्थापितांनाच मुख्य फायदा होतो आणि खऱ्या गरजूंना निव्वळ मजुरीवर भागवावे लागते, हे जवळ–जवळ सार्वत्रिक म्हणावे असे चित्र आहे. या 'मुख्य प्रवाहाचे' प्रतिबिंब गावपातळीवरही पडण्याचा धोका नाकारता येत नाही.

  म्हणून ग्रामसभेचे सक्षमीकरण करण्याचे प्रयत्न म्हणजे गावातील अल्पभूधारक, भूमिहीन आणि दलित, आदिवासी स्त्री–पुरुषांची ताकद वाढवण्याचे प्रयत्न असायला हवेत. या गटांच्या उपजीविकेच्या गरजा काय, त्यांच्या 'आज' बरोबरच त्यांचा 'उद्या' ही सुरक्षित कसा होईल याचे प्रयत्न जाणीवपूर्वक व्हायला हवेत. जिथे असे प्रयत्न झाले आहेत, सुरू आहेत, त्याचा अभ्यासही करायला हवा. रोजगार हमी कोणासाठी, कशासाठी, याबाबत प्रशासकीय यंत्रणेचे आणि त्यातही ग्रामपंचायतींचे प्रशिक्षण व्हायला हवे.

- प्रसार माध्यमांतूनही म. ग्रा. रोहयोची प्रसिद्धी 'बेकारभत्ता देणारी योजना' याऐवजी 'कष्टकऱ्यांना सन्मानाने जगण्याची हमी देणारी योजना' अशी व्हायला हवी.

या आव्हानांची आणि त्यावर करायच्या प्रयत्नांची यादीही अजून कितीतरी वाढू शकेल. थोडक्यात सांगायचे तर, मूळ रोहयोच्या विस्तारित, सुधारित स्वरूपाने निर्माण केलेल्या संधी कोणत्या हे अधिकाधिक समजून घेण्यासाठी, त्या पुरेपूर वापरण्यासाठी आणि विस्तारण्यासाठी, आपण सर्वांनी आपली वैयक्तिक आणि सामूहिक ऊर्जा–ताकद एकवटायला हवी. यातल्या 'नव्या संधी समजून घेण्याच्या' प्रक्रियेला या पुस्तिकेच्या निमित्ताने चालना मिळेल अशी आशा वाटते.

■ ■ ■

# परिशिष्ट १

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्याची रोजगार हमी योजना यांची सांगड घालून सर्वंकष रोजगार हमी योजना (महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना) राबविणे.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक : रोहयो-२००५/प्र.क्र.१०४/रोहयो-१०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २३ डिसेंबर २००५

**प्रस्तावना :**

दिनांक २३ ऑगस्ट २००५ रोजी लोकसभेने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलात आणण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयक, २००५ पारित केले आहे. त्यास दिनांक ५ सप्टेंबर २००५ रोजी राष्ट्रपतींनी मंजूरी दिली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्रात कशा प्रकारे करावी व सध्या महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या रोजगार हमी योजनेची ह्या राष्ट्रीय योजनेशी कशी सांगड घालावी हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाने विचार केला असून आता शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ या दोन्ही कायद्यातील विसंगती दूर करुन व दोन्हीतील अधिक चांगल्या व आवश्यक बाबी घेऊन राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कलम ४ व २८ अन्वये एक सर्वंकष रोजगार हमी योजना **(महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना)** राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अंमलात आणण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे मजूरांना सध्याच्या रोहयोखालील अधिकच्या सोयी-सवलती मिळत राहतील व रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल.

रोटा/एच–1363(2,500- 12- 2005)–1

२. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील १२ जिल्हयांची निवड करण्यात आली आहे. ते जिल्हे म्हणजे धुळे, नंदूरबार, अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, अमरावती, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, व गडचिरोली.

३. भविष्यकाळात केंद्रशासन आणखी ज्या जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा राबविण्याचे आदेश काढील त्या जिल्हयात सुध्दा सदर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलात येईल.

४. उपरोक्त १२ जिल्हे, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळता इतर जिल्हयात व संपूर्ण राज्यातील 'क' वर्ग नगर परिषद हद्दीत सुध्दा हीच योजना काही बाबतीत महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ प्रमाणे राबविण्यात येईल. मात्र तेथे सुध्दा केंद्रशासनाच्या कायद्याप्रमाणे सर्व इच्छूक कुटूंबांना जॉब कार्ड व ओळखपत्र इ. देण्यात येतील. याविषयी सविस्तर सूचना स्वतंत्रपणे देण्यात येत आहेत.

५. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्टये थोडक्यात पुढीलप्रमाणे असतील :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ च्या कलम २ (जी) प्रमाणे कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून शासकीय यंत्रणांशिवाय जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, अशासकीय संस्था, स्थानिक संस्था किंवा शासनाचे उपक्रम यांना नियुक्त करण्यात येईल.

(२) कलम ६ (१) प्रमाणे केंद्रशासन ठरवील त्यानुसार किमान मजुरी दर लागू होईल.

(३) कलम ७ (२) प्रमाणे बेरोजगार भत्ता देण्यात येईल. म्हणजेच, पहिल्या ३० दिवसांपर्यंत किमान वेतनाच्या २५ टक्के व नंतर ५० टक्के दराने बेरोजगार भत्ता देण्यात येईल.

(४) कलम १२ प्रमाणे महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद स्थापन करण्यात येईल.

(५) कलम १३ प्रमाणे ग्रामपंचायतीचा नियोजनात सहभाग राहील.

(६) कलम १६ प्रमाणे ग्रामपंचायतीवर योजनेच्या विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात येतील.

(७) कलम १० प्रमाणे कामाच्या निवडीत ग्रामसभेचा सहभाग घेण्यात येईल.

(८) कलम १८ प्रमाणे जिल्हाधिकारी हे जिल्हा कार्यक्रम समन्वयन अधिकारी राहतील.

(९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सह जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी राहतील.

(१०) कलम १५ प्रमाणे पंचायत स्तरावर गट कार्यक्रम अधिकारी नियुक्त करण्यात येतील. ते उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील.

(११) गट कार्यक्रम अधिकारी यांना तांत्रिक व अतांत्रिक आस्थापना उपलब्ध करुन देण्यात येईल.

(१२) कलम २३ प्रमाणे योजनेत पारदर्शकता आणण्यात येईल.

(१३) इतर सर्व बाबी राज्याच्या रोहयोप्रमाणे राहतील.

६. १०० दिवसांपर्यंतच्या रोजगाराच्या हमीच्या खर्चासाठी स्वतंत्र हिशोब ठेवावा, जेणेकरुन केंद्रशासनाकडून आर्थिक सहाय्य प्राप्त करुन घेणे सोयीचे जाईल. हा हिशोब नीट ठेवता यावा म्हणून प्रत्येक कामावरील पंधरवड्याचे मस्टर बंद झाल्यावर व मजूरांना त्यांचे वेतन दिल्यानंतर त्या मस्टरची एक अतिरिक्त प्रत गट कार्यक्रम अधिका-याकडे तात्काळ पाठविण्यात येईल. त्यावरुन प्रत्येक कुटूंबातील व्यक्तींची नावे, त्यांच्या जॉब कार्डवरील क्रमांक, त्यांनी काम केलेल्या दिवसांची संख्या व त्यांना मिळालेले वेतन यांचा डाटा संकलित करुन त्यानुसार केंद्रशासनाकडून वेतनावरील (कुशल, अर्धकुशल व अकुशल) देय असलेली रक्कम निश्चित करण्यात यावी. यासाठी तातडीने संगणकीकरण करण्यात यावे.

७. १०० दिवसांपेक्षा अतिरिक्त रोजगार देण्याची जबाबदारी राज्याच्या रोहयो निधीमधून पूर्ण करावी.

८. सदर योजनेकरिता जिल्हाधिकारी हे कार्यक्रम समन्वय अधिकारी असतील व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सह जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी राहतील.

९. गट कार्यक्रम अधिका-यांची आवश्यक ती पदे केंद्रशासनाने निवडलेल्या जिल्हयातील गटांसाठी पदे निर्माण करुन ती कंत्राटी पध्दतीने भरावीत. ते उप विभागीय अधिकारी (महसूल) यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील. पदे भरेपर्यंत तहसिलदार यांच्याकडे हे काम सोपविण्यात यावे.

१०. जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालयासाठी सध्याच्या महाराष्ट्राच्या रोहयोसाठी जी यंत्रणा आहे ती या योजनेसाठी वापरण्यात यावी.

एच–1363 –2

११. आवश्यक तेथे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यानुसार व केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी, जेणेकरुन केंद्राचे आर्थिक सहाय्य मिळण्यात अडथण येणार नाही.

१२. महाराष्ट्र ग्रामीण रोहयोखाली पुढीलप्रमाणे कामे घेता येतील:-

(१) जलसंधारण व जलसंवर्धन कामे :- मातीचे बांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम मार्कंड, सामुहिक शेत तळे, मातीचे धरण, साठवण तलाव, पाझर तलाव, पाझर कालवे, गाव तलाव, भूमिगत बंधारे, वन तलाव, बोडी नूतनीकरण.

(२) दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित) :- पडीक जमिनीवर वृक्ष लागवड, रस्त्याच्या बाजूला वृक्ष लागवड, रोप वाटिका, वृक्ष लागवड,जाळ रेषांची कामे, बांबू रांझ्या भोवती वर्तुळाकार चर काढणे, वृक्ष लागवड.

(३) जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सूक्ष्म जलसिंचनाची कामे) :- मातीचे कालवे, कालव्याचे नूतनीकरण.

(४) अनुसूचित जाती /जमाती, नवीन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे.

(५) पारंपरिक पाणीसाठयांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे :- तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण करणे व जुन्या वन तलावाचे नूतनीकरण करणे.

(६) भूविकासाची कामे.

(७) पूरनियंत्रण व पूरसंरक्षकाची कामे. पाणथळ क्षेत्रात चा-याची कामे :- खार जमीन विकास बंधारे.

(८) ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे :- इतर जिल्हा रस्ते, गांव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, शेत रस्ते, स्मशान भूमी व पाणी पुरवठा इत्यादींना जोडणारे रस्ते, रस्त्यांचे नूतनीकरण, रस्त्यांचे रुंदीकरण.

१३. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली वैयक्तिक लाभाची कामे (म्हणजे जवाहर विहिरी, खाजगी जमिनीवर फलोत्पादन, वृक्ष लागवड, तूती लागवड इत्यादि कामे) अनुज्ञेय नाहीत. म्हणून ही कामे यापुढेही राज्यशासनाच्या रोहयो निधीतून घेण्यात येतील.

१४. महाराष्ट्र ग्रामीण रोहयोकरिता कामांचे नियोजन करण्यास काहीसा वेळ लागेल. तोपर्यंत सुरुवातीला संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना व कामासाठी धान्य राष्ट्रीय कार्यक्रम (NFFWP) यासाठी तयार करण्यात आलेले अनुक्रमे वार्षिक व यथार्थदर्शी नियोजन या योजनेचा कृति आराखडा म्हणून वापरण्यात यावा. अमरावती जिल्हयाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ प्रमाणे कामाचे नियोजन करण्याची तयारी सुरु करावी व तोपर्यंत राज्याच्या रोहयोचा वार्षिक आराखडा महाराष्ट्र ग्रामीण रोहयोसाठी वापरावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रमेशचंद्र कानडे

( रमेशचंद्र कानडे )

प्रधान सचिव (रोहयो)

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव  
२) मा.मुख्यमंत्री  
३) मा.उप मुख्यमंत्री  
४) सर्व मंत्री  
५) सर्व राज्यमंत्री  
६) मुख्य सचिव  
७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव  
८) सर्व विभागीय आयुक्त  
९) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.  
१०) सर्व जिल्हाधिकारी  
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद  
१२) उप विभागीय अधिकारी (महसूल) (सर्व)  
१३) तहसिलदार (सर्व )  
१४) गट विकास अधिकारी (सर्व)  
१५) सर्व मंत्रालयीन विभाग  
१६) निवड नस्ती.

------

एच-1363(2,600-12-2005)-3

# परिशिष्ट २

**रोजगार हमी योजनेच्या दरपत्रकात सुधारणा करणेबाबत...**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : रोहयो-२००५/प्र.क्र.१३४/रोहयो-१०,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ डिसेंबर, २००५

पहा :१) शा.नि.,नि.वि.क्र.मजुरी-२००३/प्र.१७५/रोहयो-१०, दि.१६ ऑगस्ट,२००४
२) शा.नि.,नि.वि.क्र.मजुरी-२००५/प्र.१३/रोहयो-१०, दि.३१ मार्च,२००५
३) शा.नि.,नि.वि. क्र. रोहयो-२००५/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दिनांक २३-१२-२००५

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कायदा देशात सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे त्या अनुषंगाने राज्य मंत्रिमंडळाने दिनांक २६ ऑक्टोबर, २००५ च्या बैठकीत निर्णय घेतला आहे की, राज्यात रोजगार हमी योजनेखाली सध्याच्या मजुरीच्या दररोजचा दर रु. ४५ ते ५१ आहे. तो सुधारित करुन रु.६० करण्यात यावा आणि हे दर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना कायद्याअंतर्गत केंद्र शासन लागू करेल, त्या तारखेपासून अमलात येतील. या निर्णयानुसार रोहयोच्या मजुरीचा दर परिमंडळाचा विचार न करता सरसकट रु. ६० असा होणार आहे. त्यामुळे दरपत्रकातील अनुषंगिक बाबींमध्ये देखील तसे बदल करावे लागतील. या बाबी लक्षात घेऊन शासनाने मजुरीच्या दरपत्रकात त्यानुसार सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. ही सुधारणा करण्याकरिता एक समिती गठीत करण्याचे शासनाने ठरविले आहे. यासाठी खालील अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| १) विशेष कार्य अधिकारी (रोहयो) पुणे | - अध्यक्ष |
| २) विशेष कार्य अधिकारी (रोहयो) नागपूर | - सदस्य |
| ३) विशेष कार्य अधिकारी (रोहयो) अमरावती | - सदस्य सचिव |

२. समितीने मजुरी दरातील बदलानुसार दरपत्रकातील बाबींमध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन शासनास दिनांक १० जानेवारी, २००६ पर्यंत अहवाल सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( म. भ. कांबळे )
अवर सचिव,नियोजन विभाग.

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री यांचे सचिव,

A 2005 134 27-12-2005

# परिशिष्ट ३

## कुटुंब ओळखपत्र

ग्रामपंचायत संकेतांक :

(राज्यसंकेतांक/जिल्हा संकेतांक/गट संकेतांक/ग्रामपंचायत संकेतांक)

१. कुटुंब नोंदणी पत्रक क्रमांक

(वर्ष व नोंदणी क्रमांक)

२. कुटुंब प्रमुखाचे नांव :

३. अजा/अज/इ.आ.वो. लाभार्थी/भूसुधार लाभार्थी :

असल्यास [✓] अशी खूण करावी.

४. काम करण्यास पात्र व इच्छुक असलेल्या कुटुंबातील अर्जदाराच्या नावासह व्यक्तींची नावे :

| अ. क्र. | कुटुंबातील प्रौढ व्यक्तींची नावे | वडिलांचे / पतीचे नांव | स्त्री पुरुष | नोंदणीच्या तारखेस वय | मतदार यादीतील भाग क्र. व अनुक्रमांक | सही/अंगठा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

५. अर्जदाराचा पत्ता :

गाव : ग्रामपंचायत : तालुका : जिल्हा :

६. कुटुंबाची नोंदणी दिनांक :

७. सरपंच आणि ग्रामसेवक यांनी साक्षांकित केलेला कुटुंबातील रोजगार मागणाऱ्या प्रौढ व्यक्तींचा एकत्रित फोटो.

कुटुंब प्रमुखाची सही/निशाणी/अंगठा

नोंदणी करणाऱ्या प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व ठिकाण

शा. फो. झि. मु. पुणे आर/५१६ (१७,१०,०००) ५.०६

## परिशिष्ट ४

महाराष्ट्र शासन

**रोजगार पत्रक**

ग्रामपंचायत संकेतांक :

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(राज्यसंकेतांक/जिल्हा संकेतांक/गट संकेतांक/ग्रामपंचायत संकेतांक)

१. कुटुंब नोंदणी पत्रक क्रमांक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

(वर्ष व नोंदणी क्रमांक)

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत

रोजगार मागणाऱ्या कुटुंबासाठी फोटोसहीत ओळखपत्र-नि-रोजगार पत्रक

(सन २००५-२००६ ते २००९-२०१०)

(पाच वर्षाकरिता वैध)

टीप: १) ग्रामपंचायत संकेतांक हा दारिद्र्य रेषेच्या सर्वेक्षणातील संकेतांकाप्रमाणे असावा.

२) कुटुंब नोंदणी रोजगार पत्रक क्रमांकामध्ये प्रथम दोन चौकटीत वित्तीय वर्ष दर्शवावे उदा. ०५-०६ व पुढील पाच चौकटींमध्ये अनुक्रमांक दर्शवावा. उदा. ००००१

शा. फो. झि. मु. पुणे आर/५१६ (१७,१०,०००) ५.०६

## प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटातर्फे चालणारे काम

२००० सालापासून प्रयास ऊर्जा गटांतर्गत 'संसाधने व उपजीविका' गट कार्यरत आहे. या गटामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची उपजीविका या विषयावर काम सुरू आहे. वंचित घटकांच्या उपजीविकेचा प्रश्न विकासावरील चर्चेच्या व कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी यावा यासाठी 'संसाधने व उपजीविका' गट काम करीत आहे. या गटातर्फे खालील विषयांवर काम चालू आहे.

**शाश्वत उपजीविकेवर आधारित विकासविषयक दृष्टिकोनाची मांडणी व प्रसार :** 'शाश्वत उपजीविका' यावरील आंतरराष्ट्रीय चर्चेचा अभ्यास आणि या चर्चेत सहभागी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भूमिकेची चिकित्सा करणे हा या कामाचा पहिला टप्पा होता. अभ्यासक व कार्यकर्त्यांसमोर या चर्चेचे विश्लेषण मांडून त्यांची दृष्टी, त्यांचा अनुभव यांच्या मदतीने पर्यायी प्रतिमानाच्या संकल्पनात्मक बाजूवर विचार करणे आणि 'शाश्वत उपजीविकेच्या विकासविषयक दृष्टिकोनाची (Sustainable Livelihood Perspective) संकल्पनात्मक आणि कार्यक्रमात्मक अशा दोन पातळ्यांवर मांडणी करणे व त्या दृष्टिकोनाचा विविध प्रकारे प्रसार करणे यावर सध्या काम चालू आहे.

**वंचित घटकांना विकास योजना/कार्यक्रमांची आखणी, अंमलबजावणी, नियमन यावर प्रभाव टाकता यावा यासाठी उपयुक्त साधनांचा विकास :** विकासाचे उपजीविकाकेंद्री पर्यायी कार्यक्रम विकसित करताना त्या प्रक्रियांवर वंचितांचे नियंत्रण असले पाहिजे. असे नियंत्रण मिळवण्यासाठी माहितीसंकलनापासून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीपर्यंतच्या साऱ्या टप्प्यात वंचितांना खराखुरा सहभाग घेता यावा यासाठी खास साधने (tools) व पद्धती विकसित करण्यावर गटाचे काम चालू आहे. वाडीचा/पाड्याचा/गावाचा उपजीविका जाहीरनामा तयार करण्यासाठीची साधने सध्या विकसित केलेली आहेत. या साधनांचा गावपातळीवरील विविध विकास प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रसार करण्याचे काम सध्या सुरु आहे.

**रोजगार हमी योजना वंचिताभिमुख करण्यासाठी प्रयत्न :** 'रोजगार हमी योजना' या महाराष्ट्र राज्याच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेचे विश्लेषण करुन ही योजना वंचित घटकांच्या उपजीविका सुरक्षित करण्यासाठी साहाय्यभूत ठरावी यासाठी धोरणवकिलीचे (ॲडव्होकसी) प्रयत्न करणे, हा या गटाच्या कामाचा एक उद्देश आहे. याकरता रोजगार हमी योजनेतील बदलांच्या प्रश्नावर विविध संस्था-संघटनांच्या संयुक्त प्रयत्नांना अभ्यास, विश्लेषण याद्वारे पाठबळ देण्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे.

**कमी-बाह्य-साधनांच्या शाश्वत शेतीच्या पद्धतींचे विकसन, प्रत्यक्षदर्शन, प्रशिक्षण व प्रसार:** कमी-बाह्य-साधनांच्या शाश्वत शेतीचे प्रयोगाद्वारे तंत्र विकसन करणे, शाश्वत पद्धती-तंत्रांबाबत प्रत्यक्षदर्शनाद्वारे जनजागृती करणे, तसेच कार्यकर्ता प्रशिक्षण व गावपातळीवरच्या प्रत्यक्षदर्शनाद्वारे स्थानिक संस्था-संघटनांना शाश्वत शेतीच्या प्रसारासाठी साहाय्य करणे असे या कामाचे स्वरुप आहे.

## प्रयासविषयी

प्रयास हा वैद्यकीय व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील काही व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापलेला व कायद्यानुसार नोंदलेला सार्वजनिक विश्वस्त निधी आहे. प्रयासच्या वतीने 'आरोग्य', 'ऊर्जा', 'शिक्षण व पालकत्व' तसेच 'संसाधने व उपजीविका' ह्या क्षेत्रांत अनेक उपक्रम चालवले जातात. आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये वापरुन समाजातील वंचित वर्गांच्या स्वउन्नतीसाठीच्या प्रयत्नांना व संघर्षांना साहाय्यभूत ठरावे ह्या उद्देशाने प्रयासचे सदस्य काम करीत असतात. संशोधन, विश्लेषण, प्रशिक्षण, माहितीचा प्रसार, वाङ्‌मयनिर्मिती, इ. विविध मार्गांनी वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी प्रयत्न केले जातात.

---

Book - Post

Stamp

प्रति,

____________________

____________________

____________________